

प. पू. ताईमहाराज चाटुफळे

# श्रीगंध



## कवियत्री श्रीमती गोदावरी अनगरकर
## उर्फ ''मीराताई''

आनंद आश्रम, स्टेशन रोड, गुलबर्गा

# प्रस्तावना

सर्व सामान्य माणूस एका ढोबळ दृष्टीने जगाकडे बघत असतो. परन्तु स्थूल विषयांच्या मागे कांही सूक्ष्मातिसूक्ष्म घटक दडलेले असतात. ते न्याहाळण्याची दृष्टी सर्व सामान्यात नसते तर कांही पुण्यवान आत्म्यानांच लाभते, त्यांच्या या पूर्व पुण्याबरोबर त्यांची एकाग्रता, आत्ममग्नता, पराकोटीची साधना या मुळे दृष्य जगापेक्षा एका वेगळयाच जगांमध्ये त्यांचा सहज सुंदर संचार होत असतो अशाच एका पुण्यवान आत्म्याच नांव आहे. प. पू. ताई महाराज म्हणजेच साक्षात भगवती स्वरुप. त्यांच्या सहवासात येणाऱ्या असंख्य भक्तांना त्यांच्या अपरिमित शक्तीची चुणुक दिसते आणी आश्चर्याच्या महासागरांत ते भक्तगण डुंबून जातात.

दुसंऱ्यांच भल व्हाव, कल्याण व्हाव, मंगल व्हाव, आणी ते मार्गस्थ व्हावेत हेच प. पू. ताईंच ब्रीद, त्यांचा हा जणू ध्यासच. हा ध्यास म्हणजे विश्वात्मक देवा कडे त्यांनी मागीतलेल मसायदान होय. जालन्याच्या ''श्री दत्त आश्रामात'' असंख्य भक्तगण आपले आर्थीक, कौटुंबिक, सामाजीक आणी वैयक्तीक प्रश्ण घेऊन येतात आणी त्या त्रस्त झालेल्या जीवाना प. पू. ताईंचा आधार मीळतो आणी ते मार्गस्थ होतांना दिसतात.

इथे माझा स्वतःचा अनुभव नमूद करण्यात मी स्वतःला धन्य समजतो कारण मी प. पू. ताई महाराजाना गेली २५ वर्षा पासून ओळखतो. फेब्रवारी २०१३ मध्ये नातवाच्या मूंजी प्रसंगी आम्ही ठाण्यास मूलीकडे होतो. त्या पूर्वी गेले महीनाभर मला सतावत असलेल्या नाकावरील हरभऱ्या एवढया फोडाच परिक्षण माझा पुतण्या डॉ. मनीष देशपांडे मार्फत बेथनी हॉस्पीटल मध्ये झाले. तेव्हा असं निदान झाल की तो मूळासकट आणी त्याच बरोबर आजूबाजूचा जवळ जवळ अर्घा इंच भाग काढून तीथे दुसर स्कीन ग्राफ्ट करायला लागेल, डाक्टर कन्नन हे ओपरेशन करणार अेस ठरले. २८ फेबुवारीला ऑपरेशन करण्याचे ठरले माझ पू. पू. ताई महाराजांशी व प. पू. नानांशी अनुसंधान चालूच होतः प. पू. ताईनां फोन केला तारीख कळवीली

तेव्हा सुवर्णा गाढे कडून नीरोप मीळाला की नामस्मरण करा, कांही होणार नाटे, बरेव्हाल, बरे झालात की भेटायला या.

ओ. टी. मध्ये मी डॉक्टर कन्ननला भेटण्याची इच्छा दर्शविली, लगेच एक जाडेले डोळ्यांच्या खाली मस असलेले ऑपरेशन करण्यासाठी सिद्ध असलेले थोडेसे गोल चेहऱ्याचे डॉक्टर आले. मी डॉक्टरना पाहतोय की प. पू. ताईना पाहतोय हेच कळेना त्यानी माझ्या डोक्यावरुन हात फिरवत म्हणाले की कांही होणार नाही बरेव्हाल हे वाक्य ऐकलो आणी आश्चर्य व आनंदाने मनात गर्दी केली. आलेला ताण एकदम नाहीसा झाला. शुद्ध आल्यावर झालेला प्रकार सौ. नंदास सांगीतला आम्ही दोघेही आश्चर्याने दंग झालो. ते स्वतःला धन्य समजतच.

घडलेला प्रसंग मीरा ताईस फोन वरुन सांगीतला, त्या म्हाणाल्या खरोखर तू भाग्यवान आहेस.

अशा या साक्षात भगवती स्वरुप ताईनां मी पहिल्यांदा पाहील ते १९९० साली गुलबर्गा येथे. त्या वेळी प. पू. दत्तमहाराजांचा भागवत सप्ताहा निमित्त गुलबर्ग्यात डॉ. प्रभाकरराव व सौ. शांताताई यांचे कडे १० दिवस मुक्काम होता. त्या वेळी त्यांच्या बरोबर प. पू. ताई महाराज सुद्धा आल्या होत्या. पायरीवर बसून रोज आमची प्रभाती आणी भजन सेवा त्या ऐकत असत. आणी मला वाटते की त्याच वेळी त्यांचा ठाम निश्चय झाला असावा की या पूढे प्रत्येक वर्षा आमची भजन सेवा जालना येथे होईल. आणी पहाना ''संत कृपाझाली इमारत फळा आली''. गेली २५ वर्षे सातत्याने आमची भजन सेवा जालन्यात होत आहे.

आपल्या गुरुविषयीचे जे जे ज्ञान मीळेल त्याची प्राप्ती करुन त्या योगे सद्गुरुवरील श्रद्धा अधिकाधिक बळकट करणें हे सत्शिष्याचे परमकर्तव्य होय. त्या बळकटीला साहाय्यभूत असे साहित्य निर्माण करणे हे शिष्याचे महत कार्य आहे. श्रीमती गोदावरी अनगरकर यानी नेमके हेच कार्य केले आहे.

प. पू. नाना महाराज तराणेकर प. पू. दत्तमहाराज कविश्वर व. प. पू. ताई महाराज यांच्या वरती अनेक भक्तिरचना रचून त्यांना संगीतबद्ध करुन स्वतः गायीलेल्या श्रीमती गोदावरी अनगरकर उर्फ मीराताई (प. पू. नानांनी त्यांच्या भक्तीरचना ऐकून दिलेली उपमा) यानी त्यांच्या भक्ती गीता द्वारे सद्गुरुवरील भक्ती, श्रद्धा अधिक बळकट, दृढ होईल असे कार्य केले आहे. हे एक प्रकारचे सद्गुरुंचे देणेच नव्हे कां? हि संगीताची आणी गीतरचनेची देणगी मीरा ताईना त्यांच्या वडिलांकडून मिळाली आहे. ते सुद्धा उत्तम गायक आणी गीतकार होते. अमृत्वाचा स्पर्श असलेल्या, भक्तीच्या गंधाने भरुन उरलेल्या आणी परमानंदाचा सुकाळ देणाऱ्या मीराताईंच्या या भक्तीरचना ऐकणाऱ्या प्रत्येकांच्या मनाला स्पर्श करुन जातात आणी श्रोत्यांच्या डोळ्यांच्या कडा ओलावलेल्या सुद्धा दिसतात.

प. पू. ताईंच मीराताईवर अतोनात प्रेम याचा प्रत्यय प. पू. ताईंच्या तुला भरणाचे वेळी सर्वानां आला असेलच प. पू. ताईंच्या जन्मा दिवशी या भक्ती रचनांच पुस्तकात रुपांतर व्हाव अशी इच्छा मीराताईनी दर्शाविली, त्याची प्रस्तावना मीच लिहावी असा त्यांचा आग्रह झाला गुरुआज्ञा शिरसावंद्य मानून हा लहान तोंडी मोठा घास घेण्याचा भाबडा प्रयत्न केला.

प. पू. दत्त महाराज व. प. पू. ताई महाराज यांच्या वरती त्याच प्रमाणें कांही प. पू. नाना यांच्या वरती रचलेल्या भक्तिगीतांच पुस्तक रुपाने भक्तां समोर ठेवताना माझ्या आनंदाला सीमाच उरल्या नाहीत प. पू. ताईंचा कृपा आशीर्वाद सदैव पाठीशी असावा व गुरुकृपेने लाभलेल सुंदर जीवन सार्थकी लागावे एवढीच गुरु चरणी प्रार्थना.

**॥ जय नाना, जय गुरुदेव दत्त, जय जय ताई भगवती ॥**

सतीश देशपांडे

**संपर्क :**

**सतीश देशपांडे**

'आर्य', प्लाट नं. ५५, बँक कॉलनी

स्टेडीयम जवळ - गुलबर्गा - ५८५ १०२ - कर्नाटक राज्य

दु. : (०८४७२) २२४७६८ - मो : ९४४८२ ५७१८६

# मनोगत

राजाधिराज गुरुराज स्वानंद सम्राट विद्यावाचस्पती ब्रम्हश्री दत्त महाराज कविश्वर हे माझे शक्तीपात दिक्षा गुरु, चैतन्यानंद सरस्वती प. पू. नाना महाराज तराणेकर हे मझे मंत्र दिक्षा गुरु आणी प. पू. ताईमहाराज अर्थात साक्षात भगवती स्वरुप हया माझ्या माता, माझ्या भगीनी, माझ्या सखी आणी सर्व कांही. अशा या असामान्य सद्गुरुंचा त्रिवेणी संगम माझ्या जीवनात आला, या संगमात सुस्नान होण्याचे भाग्य मला लाभले आणी जीव धन्य झाला.

मी रचलेल्या एका भैरवीत मी असे म्हटले की "गुरुरुपे अनंत असती, गुरु भाव एकच हो" याची अनुभुती आली, शेवटी हे संत महात्मे एकच असतात, कसे की नाना महाराजानी माझ्या व्यथा ओळखून मला प. पू. दत्तमहाराजांचे जवळून दर्शन घडविले. पाहता पाहता प. पू. दत्तमहाराजानीं मला प. पू. ताई महाराजांचे जवळून दर्शन घडविले याचाच परिणाम म्हणून की काय प. पू. नाना प्रमाणे प. पू. दत्त महाराजानी माझ्या कडून भक्ती गीतांची रचना करवून घेतली, "असो नसो भाव ध्यावे नाम हाचि नेम" ह्या माझ्या मनाचा निश्चय करवून घेतला. व्यांच्याच आंतरिक प्रेरणेने मी प. पू. ताई महाराजांवरती भक्ती रचना रचल्या आणी त्या गातांना मला स्वतःला आणी ऐकताना भक्तगणांना आनंदाने न्हाऊन निघत्याची जाणीव होते.

प. पू. ताई महाराजानी जालना आणी जालना बाहेर दूरपर्यंत अनेकांच्या दुःखावर मायेची फुंकर घातली आहे. आणी त्यांना ताईंच्या शक्तीचे विलक्षण थक्क करणारे अनुभव आले आहेत. संतांच्या जीवनात चमत्कार हे. असतातच नाम जप आणी दान हया दोनच गोष्टी माणसाला कलीयुगातून तारुन नेतील असे प. पू. ताई म्हणतात. श्री दत्ताश्रमात येणारी प्रत्येक व्यक्ती पोटभर जेऊन तृप्त होऊनच गेली पाहीजे अशी ताईंची इच्छा असते. कुणी दूरच्या प्रवासाला निधाल्यास त्यांना वाटेत खायला सुध्दा देतात. ताई महाराजांकडे येणाऱ्या

प्रत्येकाच्या दुःखावर उपाय सांगता सांगता त्या खर तर त्या भक्तांच मन हळू हळू इश्वर चरणी लावतात आणी अंतर्मुख होऊन तो भक्त स्वतःच्या मनात डोकावून पहायला लागतो, केवढ ते सामर्थ्य! आशा अनेक अनुभूती मला स्वतःला सुद्धा आलेल्या आहेत हेच लोका पर्यंत पोहोचावेत या हेतूने या सर्व सद्गुरुनी माझ्या कडून या भक्ती रचना करखून घेतेल्या आहेत. प. पू. ताईचा कृपा-आशीर्वाद म्हणा किंवा आंतरिक प्रेरणा म्हणा प. पू. दत्त महाराज, प. पू. नाना महाराज व प. पू. ताई महाराज यांच्या वरती रचलेल्या भक्ती रचनांच पुस्तकात रुपांतर व्हांवे असे मला वाटले.

श्री राम नवमीला प. पू. ताईंचा वाढ दिवस त्या दिवशीचं औचित्य साधून त्या पुस्तकाची एक प्रत ताईना दाखवीली, आशीर्वाद घेलला अशा या तिन्ही असामान्य सदगुरु वरील भक्ती रचनेच्या त्रिवेणी संगमाच ''श्रीगंध'' हे काव्य स्वरुप पुस्तक भक्तां समोर हे ठेवतांना माझा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

**मीरा**

(श्रीमती गोदावरी अनगरकर)

## ताईंची भूपाळी

# राग - मालकंस

जाग जाग ताई आता वाढ वेळ झाला
सप्त सुरांनी सुरेख ओंकार लावीला ॥ धृ ॥

उजळे हि पूर्व दिशा दर्शनासी आली उषा
मंद जाहल्या तारा लोपली पहा निशा
पक्षि गाती भूपाळ्या जागे करण्यास तुला ॥ १ ॥

दाही दिशा आल्या हो वेद-घोष करण्यासी
एक तारी, टाळ घेऊनी भक्त येति भजनांसी
पहाट गाणी गात गात वासुदेव आला ॥ २ ॥

गोठयातुनि हंबरति धेनु वत्स पहा किती
जात्यावरि गोड गोड ओव्या हो कुणि गाती
पुष्पातिल गोडवा वारा घेऊनी आला ॥ 3 ॥

जय जय जय ताई ग, जय जय जय भगवति
ओवाळिते मिरा तुज हि सुरांची आरति
सुप्रभाति नादब्रम्ही नित्य रंगवा हो तिला ॥ ४ ॥

# राग - शिवरंजनी

यावे ताई भगवति तुमचे स्वागत
ऐक आई भजन बसुनि नीवांत ॥ धृ ॥

तुझ्या मंदिरात आज आम्ही आलो
दर्शन घेऊनी पावन झालो
सेवे मध्ये जर कांही चुकलो
क्षमा मागतो जोडुनिया हात ॥ १ ॥

तुझ्या पुढे गावे कसे भिती मनात
सूर जर नाही आले अचुक कंठात
पण भक्ती भोळा भाव फुललाहे ह्दयात
सांगणे नको हे तुजला सर्व आहे ज्ञात ॥ २ ॥

शत वर्षे सेवा घडावी बसुनि तू समोर ऐकावी
संकल्पाची पूर्ती ताई करावी
जीवनाच्या सांज वेळी आंस एकचि मनात
तुझे नाम शेवटिच्या क्षणी यावे मिरेच्या ओठात ॥ 3 ॥

जनम् दिन् पर बधाई तुम्हे देने हम आये हैं ताईजी
जनम् दिन् मनाने सारा ब्रम्हांड आया है ताईजी ॥ धृ ॥

प्रभू रामजीका भी जनम दिन आज है
गाएँगे, नाचेंगे धूम मचाएँगे ताईजी ॥ १ ॥

जीयो हजारो साल, साल के
दिन हो पचास हजार ताईजी ॥ २ ॥

जीवे तू शरद-शतम् ताईजी
मेनी हॅप्पी बर्थ-डे-टू-यू ताईजी ॥ 3 ॥

सप्त चिरंजिवासम आयु तुला लाभूदे
हुट्ट हब्बद शुभाशयगळू ताई निनगे ॥ ४ ॥

तुम्हे देख के जीया झूमने लगा है
आनंद सागर मे मीरा डूबत है ॥ ५ ॥

# राग - हिंडोल

जय जय जय जय ताई भगवती
मिरेसि चरणी द्यावा ठाव विनंती ॥ धृ ॥

तुझे रुप पाहुनि मनोहर, प्रेमाश्रूंना येई पूर
येती हृदयी गोड अनुभूति ॥ १ ॥

तव कमल चरणि टेकविता शिर, विकल्प जाती निघुनि दूर
देह भाव सर्व विसरुनि जाती ॥ २ ॥

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी
अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी

वारी वारी जन्म मरणाते वारी
हारि पडलो आता संकट निवारी ॥ 3 ॥

परिक्रमा आचरिताती भावे
दैवी तुझे रुप तया दिसावे
साक्षात तु माऊली अन्नपूर्णे
श्री नर्मदे देवी नमो नमस्ते ॥ ४ ॥

शरेण्ये वरेण्ये सुकारुण्य पूर्णे
हिरण्यो दरादैर्य गम्येति पूण्ये
भवारण्य भितीमृच मां पाहि भद्रे
नमस्ते नमस्ते नमस्ते भवानी ॥ ५ ॥

# करुणेश्वरी

करुणेश्वरी, त्रिपुरेश्वरी, कामेश्वरी ग आई
आता तरि ओठावरि यावे तुझे नाम ताई ॥ धृ ॥

मन माझे कां ? बेचैन से झाले ग आज आई
ह्रदयात तू येवोनिया मन स्थिरकर ना ग ताई ॥ १ ॥

गंगेश्वरी, गोदेश्वरी, नर्मदेश्वरी तू ग आई
बुडु दे मला प्रेमी तुझ्या मातेश्वरी ताई ॥ २ ॥

झाली आता तिन्हि सांज ही या जीवनाची ग आई
जाईन मी जेथे-तिथे राहशील ना संगे ताई ॥ 3 ॥

मीरेनि केली सकाम भक्ति, केला जिवनाचा व्यापार आई
निष्काम भक्ति दे ग आता, जीवनाचा आधार ताई ॥ ४ ॥

# राग - वीभास

आज मला घडले स्नान कोटी तिर्थ क्षेत्रांचे
ओली चिंब झालें पहा बघुनि प्रेम ताईचे ॥ धृ ॥

मनातल्या देवाला मी कसे ओळखावे
ताई तूच आज मजला हेचि शिकवावे
संपवावे आता सर्व विकल्प मनाचे ॥ १ ॥

घडले होते पुण्य कांही ताई याच साठीं
संकटात उभि होतिस ग तूच माझ्या पाठी
घाबरला मृत्यु पाहुनि रुप चंडिकेचे ॥ २ ॥

जन्म देशी जन्म घेशी, दैव घडविशि
जीवनाचे सूत्र आहे ताई तुझ्या पाशी
वेड लागूदे ग मजला तुझ्या चिंतनाचे ॥ 3 ॥

नसे आस कसली आता जाणशी तू आई
अंति स्मरण व्हावे तुझे मागते मी ताई
भय ते नसावे कधिही मिरेसी काळाचे ॥ ४ ॥

# ताई संग होळी

आलो ताई तुझ्या संगे रंग खेळण्याला
भक्ती प्रेमाच्या रंगी बुडण्याला ॥ धृ ॥

तुळजापुरहुनि आणिले भवानीला
माहुरगडाहुनि आणिले रेणुकेला
अंबेजोगाई हुनि आणिले जोगाईला ॥ १ ॥

शृंगेरीहुनि आणिले शारदांबेला
सन्नतिहुनि आणिले चंद्रलांबेला
बासर गडाहुनि आणिले सरस्वतिला ॥ २ ॥

करविराहुनि आणिले अंबाबाईला
कलकत्याहुनि आणिले कालीकेला
पंजाबहुनि आणिले वैष्णोदेविला ॥ 3 ॥

एक्कावन पिठाच्या सर्व देवता आल्या
ताई संगे हो रंग खेळण्याला
सारा ब्रम्हांड मोर बनुनि नाचला ॥ ४ ॥

इस प्रेमरंग रंग भरि होलीमे। सब संत होरी खेलने आये
वामन आये, नाना आये, दत्त भि आये, अरविंदकाका भी आये,
सदाशिव भी आये, नारायण काका भी आये, अरुणकाका भी आये,

नरेंद्र स्वामी आये, सुर किन्नर भि आये
ब्रम्हा आये, विष्णु आये, महेश भी आये
चांद सूरज तारे होरी देखने आये

भक्त देवांचि रंगली होरी लीला
ताईंच्या दरबारी प्रेम सूर लागला
कृष्णाने गोड पावा वाजविला
''मिरेचा'' जीव सावळ्या रंगी रंगला

## तन ताई - मन ताई

# राग

मी ऽऽऽ ही मीरा
तन ताई मन ताई
प्राण माझे तूंच ताई
रंगले तुझ्या ग प्रेमी मी ऽऽऽ ही मीरा ॥ धृ ॥

रुप तुझे गोड गोड, लावितसे जीवा वेड
श्वास तूं, ध्यांस तूं, भक्ती तूं, शक्ती तूं
तव चरणी ऽऽ ठाव दे मला ग ताई
मी ऽऽऽ ही मीरा ॥ १ ॥

येउ कधी भेटीला, चैन पडेना ग मला
तळमळे जीव असा, पाण्या विण मच्छ जसा
समजेना ऽऽऽ साहू कसा विरह ताई
मी ऽऽऽ ही मीरा ॥ २ ॥

तूंच माय भगवती ग
तूंच माय रेणुका ग
गंगा तूं यमूना तूं
सिन्धू तूं गोदा तूं
मन माझे ऽऽऽ शुध्दकरी आता ताई
मी ऽऽऽ ही मीरा ॥ 3 ॥

# ताईंचा पाळणा

जो जो जो जो ग रेणुका आई
जय जगदंबे जय भगवति माँ ताई
आला चाँदोबा, चांदण्या आल्या गाण्या तुज अंगाई ॥ धृ ॥

सजवीला पाळणा ताई तुजसाठी
नक्षात्रांच्या मधू फुलानी
पाहति कौतुक सुर, नर किन्नर
आकाशीच्या नयनानी ॥ १ ॥

जन्मली सावित्री, जन्मली लक्ष्मि, जन्मली पार्वती आई
तिन्ही देवता आल्या तव स्वरुपी जगदोध्दारा साठी ताई ॥ २ ॥

राम जन्मुनी आला तुजसाठी राम मंत्र तुजला देण्यासी
राम नाम हिच शक्ती याजीवाची
ताई तू हे दाविलेसी ॥ 3 ॥

चैतन्य रुप तुझे पाहुनिया डोळा 'मिरेसी' आनंद झाला
हालविण्या पाळणा ताई तुझा ग ब्रम्हांड आज येथे आला ॥ ४ ॥

# राग - पटदीप

हे सूरानों परत या नां
सोडूनि कां चालला हो रुसुनिया माझ्यावरी कां ? ॥ धृ ॥

जन्मुनी आले मी जेंव्हा
कंठी होता तुम्ही तेंव्हा
साथ दिधली आजवर ही
आज मग कां सोडता ? ॥ १ ॥

देव तुम्हासी मानीले रे
निरस जीवन सूर बिनारे
रंगले मी नाद ब्रम्ही
नाद कां आजि थांबला ? ॥ २ ॥

साथ जर नाही सूरांची
कशी करु सेवा गुरुंची
गाऊ कैसे भक्ती गीता
लय सूरा विण व्यर्थ आता ॥ 3 ॥

शपथ माझी ही तुम्हाला
वचन ऐसे द्या 'मीरेला'
तोवरी राहणार कंठी
जोवरी हा श्वास चाले ॥ ४ ॥

# राग - मिश्र पहाडी

धावुनि आलो रे आम्ही मागण्याच साठी
कविश्वर दत्ता आमुच्या राहा नित्य पाठि ॥ धृ ॥

लोक कल्याणासांठी झिजवीलि हि काया
कुणाशी न कळावी ऐशी अगाध हि माया
दिव्य आहे जेथे तेथे झुके सारी सृष्टी ॥ १ ॥

दत्त नाम धरुनीया तू कृष्ण गूण गाइले
दत्त - कृष्ण एकचरुप जगासी हे दावीले
कर्म भक्ति ज्ञानांच्या या सांगुनीया गोष्टी ॥ २ ॥

स्मरण तुझे होते आम्हा नित्यनिरंतर
सोडुनिया गेलासी कां इतुका तू दूर
एकदा तरि घडूदे मधुर गाठी - भेटी ॥ 3 ॥

वेडेवाकुडे कसे हि तुझे नाम घेतो
ऐकीले जरि नाही तु तुझेचि म्हणवितो
मिरे वरी देवा दत्ता ठेवा कृपादृष्टी ॥ ४ ॥

# राग - मारोबिहाग

दत्त नामी असा जीव हा रंगला
भेटीचा च सोहळा स्वप्नी मी पाहीला ॥ धृ ॥

अंगणातिल तुळशी पाने देउनीया तू मला
शुध्द-जीव कसा असावा भाव मनी हा जागवीला
आईच्या मायेनी ओटी घातलेसि श्रीफळा ॥ १ ॥

काय मागावे तुला हे नाहि कळले रे मला
पाहूनिया दिव्य रुपा जीव हा भांबावला
दत्त माझ्या जवळी आहे आज आले अनुभवाला ॥ २ ॥

मम मनाच्या बागे माजी मोगरा तु फुलविला
करुनीया पूजा तुझि रे चरणि तो मी वाहिला
पर-तत्वाचा स्पर्श घडला
मी पणाचा विसर पडला ॥ 3 ॥

ये पुन्हा ये स्वप्नी माझ्या पार्थना करिते तुला
देउनी श्रध्दा मनी हि जागवीले प्रितीला
मीरे ओठी हास्य देउनि अर्थ दिधला जीवनाला ॥ ४ ॥

# राग - देस

आवडीने भावे आम्ही तुझे नाम घेतो
तुझ्या चरणि गुरुदत्तारे माथा टेकवितो ॥ धृ ॥

वेदानाही नही कळले तुझे हे स्वरुप
भाग्यवान ठरलो आम्ही पाहुनि ते रुप
जागृति सुशुप्ती आम्ही तुलाचि पहातो ॥ १ ॥

तुझे तुला अर्पण करण्या तुझ्या दारी आलो
दुझ्यासाठी गाउनी आम्ही धन्य धन्य झालो
भजनी तुझ्यारे दत्ता नित्य असे रंगतो ॥ २ ॥

नको आता आंस कसलि नको नको आसक्ती
देउनीया ओठी नाम वाढवी तू भक्ती
या विणे न दूजे कांहि तूला आम्ही मागतो ॥ 3 ॥

वेडि-वाकुडि हि सेवा गोड करुनि घ्यावी
श्रध्दा भक्ति प्रेमाचि ती वाट दाखवावी
मीरा मनी आनंदाचा गंध हा पसरतो ॥ ४ ॥

# राग - शुध्द सारंग

कविश्वर दत्त दत्त घ्यावे गोड नाम
तुझा वास जेथे तेथे तेच पुण्य धाम ॥ धृ ॥

पवित्र हि गंगा वाहे तुझ्या पाशी
कशासाठी जाउ मी तिर्थ क्षेत्र काशी
पतित पावन होशी हाच तुझा धर्म ॥ १ ॥

तुझि वाग्वाणी माय ती सरस्वति
कसे वानू तुजला दत्ता अल्प माझी-मति
असो नसो भाव घ्यावे नाम हाचि नेम ॥ २ ॥

प्रेम भक्ती भिक्षा देई आले तुझ्या द्वारी
घेतल्या वाचूनि नाही जाणार माघारी
मिरेसि तू सांगावे कृष्ण भक्तिचे मर्म ॥ 3 ॥

मोही गुंतुनीया माझे मूळ हरवुनी बसलेरे
मनाचा हा गूंता दत्ता तूंच सोडविरे
जगत् कल्याणा साठी ही प्रार्थना व्हावी नित कर्म ... ॥ ४ ॥
तुझा वास जेथे ....

# राग - भैरवी

प्रेम भक्ती भिक्षा तुझी घेऊनी निघाले
आनंदाचे डोहि मन आनंदात न्हाले ॥ धृ ॥

प्रेम भक्ति भिक्षेचि तू केली बरसात
मन मंदिरी या वाजे बासुरी सुरात
तुझे दिव्य रुप बघुनी भारावुनि गेले ॥ १ ॥

अमृता हुनि गोड तुझे नाम देवा
दुःखी जीवनास माझ्या लाभला विसावा
दत्त नाम गजराने ब्रम्हांड व्यापीले ॥ २ ॥

तुझे स्मरण होता होते मन हे बेचैन
होतसे तुलाहि कारे माझी आठवण
करुण असे सूख अनुभवासी आले ॥ 3 ॥

तुझ्या दर्शनाची आंस लागली जीवाला
कविश्वर दत्त नामी लागला जिव्हाळा
कृष्ण वेड्या मिरेसी हे परब्रम्ह भेटले ॥ ४ ॥

गुरुदेव दत्त कविश्वर गुरु नानाजी
घालीतो तुला दंडवत मॉ ताईजी ॥ धृ ॥

संकटी राहता तुम्ही हो आमुच्या पाठीशी
पूर्व पुण्य आहे बहु आमुच्या गाठीशी
न पडो कधिच विसर तुमचा ऐसे कराजी ॥ १ ॥

जन्म झाला कशासाठी कुणासांठी ते कळेना
प्रकृतीचा काय खेळ आम्हा समजेना
खेळ मांडुनि बसलो परी खेळता येईनाजी ॥ २ ॥

रात्रंदिन सहाशत्रु संगे खेळतात जी
गोंधळात सापडलो कांही कळेनाजी
या दुष्ट शत्रुपासुनि आता मुक्त कराजी ॥ ३ ॥

मन शुध्द करुनी चालवा आता या देहासी
चरणी ठाव द्यावा तुम्ही आपुल्या 'मीरेसी'
सत्संगाचा लाभ घडो क्षणो क्षणीजी ॥ ४ ॥

|| जयनाना ||

## प. पूज्य सौ. ताईच्या वर रचले गेलेले हे गीत

जयजगदंबे ताई भगवती ये ग ये आई
कुशीत घेऊनी प्रेमाचा मज पान्हा तूं देई || धृ ||

रुप मनोहर तुझे स्वरुप हे दीव्य आदिशक्ती
तुझ्या ठाई ही नित्य निरंतर जडो माझी भक्ती
तुझे नाम नित वदनी यावे ऐसे करी कांही || १ ||

देव कसा तो कुठे असे हो नसे ठावे मजला
जय मातेश्वरी ताई ग मी तुझ्यात तो पाहिला
राहू दे मज प्रेमभक्तींच्या तव चरणा ठाई || २ ||

नाम जपानी संसारी तूं परमार्थचि साधीला
दावीलेसी तूं नामचि तारी जगती मानवाला
जयजयकार तुझा जगदंबे त्रिभूवनांत ताई || 3 ||

वाटे मजसी तुझ्या मी अंकी शिर हे ठेवावे
मनातील ग सुखदुःख आई तुलाच सांगावे
मीठीत तुहिया 'मीरेचे' मन शांतशांत्र होई || ४ ||

## ॥ जयनाना ॥

त्रिवीध ताप निवारीणी ग
मॉं भगवती ताई माई ग

तूं विद्येश्वरी तूं कामेश्वरी तूं कमलेश्वरी तूं माहेश्वरी
करुणेश्वरी तूं त्रिपूरेश्वरी ग मॉं भगवती ॥ १ ॥

शांती रुपिणी शक्ती स्वरुपिणी
श्रध्दा रुपिणी भक्ती स्वरुपिणी
प्रेम रुपिणी मातृ स्वरुपिणी मॉं भगवती ॥ २ ॥

ज्ञान रुपिणी ध्यान स्वरुपिणी
भाव रुपिणी गंध स्वरुपिणी
स्मृती रुपिणी श्रुति स्वरुपिणी मॉं भगवती ॥ ३ ॥

गेय रुपिणी गान स्वरुपिणी
गीता रुपिणी विश्व स्वरुपिणी
ब्रम्ह रुपिणी आत्म स्वरुपिणी मॉं भगवती ॥ ४ ॥

गंगा गोदा वसती चरणी
नाचे नर्मदा गाऊनी गाणी
अवभृत स्नानाची आम्हा पर्वणी मॉं भगवती ॥ ५ ॥

तूं लक्ष्मी तूंच भवानी
तूं सावीत्री जगत् जननी
मीरेसी तव ठेवी चरणी मॉं भगवती ॥ ६ ॥

देई देई ताई दर्शना ग, आले आले मी धावुनिया ग
चैन पडेना जीवासी या ग, झाले कधि भेटेन तुला ग ॥ धृ ॥

विणिले संसाराचे जाळे स्वतः भोवती ग
अडकले त्या मध्ये न कळत ग
यावे बाहेर कसे ना कळे ग
हाताशी धरुनि तू बाहेर काद ग ॥ १ ॥

टाकीचे घाव सोसल्याविणा ग
देव पण येत नाही कधी ग
घाव सोसण्याची शक्ती तू दे ग
आनंदाने भोग असे भोगु दे ग ॥ २ ॥

भक्त सांगती तुजसी दुःख आपुले ग
आई होऊनिया तू ऐकतेस ग
प्रेम पान्हा तु त्याना देतेस ग
पाठीवरुनि हात फिरवतेस ग ॥ 3 ॥

माणसाला देव होणे सोपे ग
माणूस होऊनि जगणें कठीण ग
ताई चरणी विनंती अशी ग
भाणुसकि जागवावी 'मिरा' मनि ग ॥ ४ ॥

ताई माँ ताई माँ हमारे सत्संग मे आना
आके हम सबको पावन करना ॥ धृ ॥

आपही आना साथ भक्ती जी को लाना
भक्ती रस रंग मे हमे डूबो देना
आपही आना साथ ज्ञानजी को लाना
ज्ञान दान देके हमे ज्ञानी बनाना ॥ १ ॥

आपही आना साथ योगजीको लाना
माया मोहसे छुडाके हमे योगी बनाना
आपही आना साथ धर्म-निती लाना
धर्म-निती मार्ग पे तू हमे लेके जाना ॥ २ ॥

गंगा तुम्ही होना, जमुना तुम्ही होना
गोदा तुम्ही होना नर्मदा तुम्ही होना
अनेको है नाम तुम्हारे पर पानी एक है ना
नाम नौकेमे बैठे हम, हमे पार ले जाना ॥ 3 ॥

जनम जनम तक ताई माँ सेवा हमसे लेना
सप्तसूर बन के हमारे कंठमे तूं रहेना
'मीराको' हे माँ ताई गले लग लेना
नयन भरे आसुवोंको गंगा जल बनाना ॥ ४ ॥

जायेंगे हम सब मिलके माँ ताई के दर्शनको
सप्त सूरोंकी माला उन्हे पहेनानेको ॥ धृ ॥

माँ ताई है ममताकी मूरत भोली भाली उनकी सूरत
माँगेगे हम उनके चरन छुवनको ॥ १ ॥

माँके आँगन में भरा है गोरस
हात जोडके खडा भक्तीरस
चलो चलोरे लुटानेको ऐसे प्रेम रस को ॥ २ ॥

बहोत बडी माँ है तेरी दुनिया
समझ न पाये हम तेरि ये माया
दे भाव हमरे मन मे तुझे पहेचानेको ॥ 3 ॥

सब धरति की तू माता है
चांद सूरजकी तू सुंदरता है
दे दो हमे दिव्य दृष्टी तुझे देखनको ॥ ४ ॥

हे जगदंबा हे भगवती माँ
हे रेणुका माँ हे कालीका माँ
गोदमे अब तुम लेलो अपने "मिरा" को ॥ ५ ॥

## ॥ जयनाना ॥

आले तुझ्या द्वारी ताई होऊनी भिकारी
भक्तीच्या सूरांची भिक्षा मागे एकतारी ॥ धृ ॥

तुझ्या दर्शनाने मी धन्य धन्य झाले
तुझ्या चरणी शिर ठेऊनी मीपणा विसरले
समाधी अशीच लागो असे करी कांही तरी ॥ १ ॥

नको देऊ पैका नको सोनियाची खाण
तुझ्या कृपेची न पडूदे मला कधी वाण
घडो अशी सेवा तुझी निरंतर कामेश्वरी ॥ २ ॥

संत सखू, मुक्ताबाई जनाबाई तूं ग
मातृदेव दर्शन घडते तुझ्या स्वरुपी ग
माय भगवती ही तूची तुचि त्रिपूरेश्वरी ग ॥ 3 ॥

जन्मो जन्मी द्वारोद्वारी भीक्षा हीच मागूनी
थकुनी ही मीरा आली आज तुझ्या अंगणी
ज्ञान बोध सूर जोगवा ओटी घाल आता तरी ॥ ४ ॥

नको उशीर लाऊ आता नको फिरवू माघारी
जोवरी न भिक्षा देशी थांबेन मी तोवरी थांबने मी ॥ ५ ॥

# राग - भीमपलास

दासनवमी ६-3-२०१३

रामदासा परत यानां भारताची दुर्दशाही डोळियासी पाहवेना ॥ धृ ॥

मांडवातुनी तुम्ही पळाला लग्न बंधनी नाही अडकला
जगत कल्याणाचा एकचि ध्यास तुम्ही हो धेतला ॥ १ ॥

परतुनी जर तुम्ही आलाना राजे शिवबा पुन्हा येतीलना
सर्व जगाला सुखी करतील ना शांतीचा झेंडा फडकेलना ॥ २ ॥

मंदिरे तुम्ही बांधलीना वासुदेवासी स्थापिलेना
देश भक्तीचे घडे दिलेना क्रोध मनासी कीती केलाना ॥ 3 ॥

भाव विश्व शुध्द ठेवालना शरीर संपत्ती जेव्हा मिळवालना
टीकून राहील राष्ट्र तेव्हाच ना शिक्षा हीच तुम्ही दिलीना ॥ ४ ॥

कुठुनी आलो ते कळेना जायचे कोठे समजेना
मूळ स्वरुपा विसरलोना आत्मज्ञान देण्यासी याना ॥ ५ ॥

दास नवमी आज आहेना भक्त बसले भजन करण्या
रामासह येऊनी ऐकाना 'मीरा' वाहते चरणी सूरांना ॥ ६ ॥

राम नवमी आज आहेना जन्म दिवस तांईचा पहाना
भक्त बसले ताई दर्शना राम प्रभू तुम्ही या हो या नां ॥ ७ ॥

# ताई भगवतिचा नीरोप घेताना

## राग - अहिर - भैरव

जाऊनी येऊ परत पुन्हा ताई तुझ्या भेटीला
संगे घेऊनी जातो तुझ्या प्रेमाच्या शिद्धोरिला ॥ धृ ॥

संग तुझा लाभला देहभाव विसरला
जीव धन्य जाहला भक्ती भाव जागला ॥ १ ॥

वचन दे ऐसे आम्हाला, विसरणार नाही तुम्हाला
वाढू दे ग नित असेच आमुच्या या विश्वासाला ॥ २ ॥

स्पर्श करता चरणांला अश्रु येति लोचनाला
जवळी घेऊनी या मिरेला दे निरोप आज तिला ॥ 3 ॥

# राग - देसकार

तुझे नाम ओठी येण्या काय मी करावे
कविश्वरा सांगा कैसे मन आवरावे ॥ धृ ॥

जन्मा येऊनीया जगती कांही नाही केले
अज्ञानात सारे देवा आयुष्य हे सरले
पुण्य कर्म आता तरि ते घडवुनि घ्यावे ॥ १ ॥

कळे मला सर्व परि ते मना ना वळेचि
प्रेमे सांभाळुनि सर्व घेई आता तुची
सुख दुःख दोन्ही माझ्या मनि स्थिर व्हावे ॥ २ ॥

पाप पुण्य कर्म धर्म सर्व तुझ्या हाती
पराधीन जीव सारे जिवनी या जगती
योग्य कां अयोग्य सारे तूचि ते जाणावे ॥ 3 ॥

चांदण्यापरि मन मंदिरि मूर्ति तुझि दिसावी
प्रेम भक्तीचि हो ज्योती हृदयी जागवावी
गुरुदेवा मिरेसी तु अभय हेची द्यावे ॥ ४ ॥

# राग - दरबारी

तुझे रुप गोड, गोड तुझे नाम
कविश्वर दत्त माझे कैवल्याचे धाम ॥ धृ ॥

वेदानाही नाही कळले तुझे हे स्वरुप
भजते करुनी मी भक्तीचे हे माप
नाम संकीर्तन हेचि व्हावे नित्यकर्म ॥ १ ॥

भवसागरातुनि नेई पैल पार
तुझ्यावरी दत्ता आता असे सर्व भार
करुनि तरी घे भक्ती ही सकाम ॥ २ ॥

थकला हा जीव करुनि प्रवास
मनी माझ्या आता असे एक आस
दावी तुझ्या रुपी तू तो राधिकेचा शाम ॥ 3 ॥

प्रेमाचे स्वरुप मना आकळेना
भक्ती गीत सूर मला सापडेना
मीरा आली दारी तुझ्या होऊनी सुदाम ॥ ४ ॥

# राग - गावती

कविश्वर दत्त दत्त जयजगदीश्वर
परब्रम्ह आले आले भूमी तलावर ॥ धृ ॥

किती जन्म पुण्य केले दर्शन घडले
जीवनाचे आज आमुच्या सार्थक झाले
टेकविला माथा आम्ही तव चरणावर ॥ १ ॥

चंद्र सूर्य नक्षत्रेहि तिथी मास तूरे
तुझ्या रुपि विश्व सारे नटले कसे रे
ज्ञान दृष्टी देई आम्हा माथा ठेवुनिया कर ॥ २ ॥

कर्म सूत्र ब्रम्हांडाचे धरुनीया हाती
बाहुल्यांचा खेळ ऐसा मांडुनिया जगती
संत-संगी आम्हासी हो खेळवा निरंतर ॥ 3 ॥

तुझ्या दरबारी आजी भक्तांसह मिरा आली
गुरुदेव दत्त चरणी स्वरांजली वाहिली
भाव भक्ती प्रेमाचा तो लागो कंठी सूर ॥ ४ ॥

# राग - अहिर भैरव

तूचि कर्ता आणी करविता
कविश्वर दत्ता भगवंता ॥ धृ ॥

करुणाधन तू असशी दत्ता
किती आळवू तुजला नाथा
सरुनि जाऊदे भव - भय - चिंता ॥ १ ॥

नाद ब्रम्ही ते रुप दिसावे
पार्थासम मज जवळी करावें
ऐकवी पुन्हा ती भगवत्‌गीता ॥ २ ॥

जीयो हजारो साल
साल के दिन हो पचास हजार
हेचि मागणे तुजला अनंता ॥ 3 ॥

गुरु कृपे विण जीवन व्यर्थ
पुर्व पुण्य घडवि परमार्थ
कृपा करि आम्हांवरि आता ॥ ४ ॥

# राग - मिश्र पहाडी

गुरुदेव, देव हाची भाव गुरुदेव
मीरा मनी जागवि नित्यनिरंतर ॥ धृ ॥

असेन चुकले कधि कुठे रे
अपराध माझे पोटी घाली रे
क्षमा करुनिया जवळी घेइ रे ॥ १ ॥

सहा वैरि जाण्या साहय करि रे
तरिच आवडिने ध्यान धरिन रे
ध्यानात दत्ता तुज पाहिन रे ॥ २ ॥

भक्तीच्या वाटेनी घेऊनी जा रे
प्रेमाचे मंदिर मज दाखवी रे
विश्वरुप दर्शन देई आता रे ॥ 3 ॥

भजनी समाधी अशी लागू दे रे
कर ठेवि माथा दत्ता असा रे
ओंकार कंठी स्थिर होऊदे रे ॥ ४ ॥

# राग - कल्याण

गुरुदेव, गुरुदेव, गुरुदेव
वामन योगी मार्तंड प्रभू दत्त कविश्वर ॥ धृ ॥

एक तपस्वी श्री योगेश्वर
दुजा शोभला जय जगदिश्वर
तिजा असे ओंकार महेश्वर दत्त दिगंबर ॥ १ ॥

ब्रम्हा विष्णु महेश मूर्ती
अवतरले हो धरणी वरती
संकटात भक्तांसी तारिती नित्य निरंतर ॥ २ ॥

धन्य जाहली माता पिता ती
अशा सुपुत्रासी जन्म हो देती
अनंतनंत उपकार करीति या जगतावर ॥ 3 ॥

नाम येऊद्या ओठावरति
अखंड राहो हृदयी भक्ती
मीरा गाते तव गुण गीति लागो ओंकार ॥ ४ ॥

# राग - कलावती

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।
प्रणतः क्लेश नाशाय गोविंदाय नमो नमः ॥

जेथे मनजाई तेथे राहि तू अनंता
कविश्वर दत्ता जय भगवंता ॥ धृ ॥

संकल्प विकल्प मनाचा हा खेळ
सुविचार देवोनीया राखी समतोल
मन शुध्दि होवो आता ऐसे करि नाथा ॥ १ ॥

राहा माझ्या संगे नित्य घडो संत् संग
तुझ्या साठी गाता यावा भक्तीने अभंग
विसरावे मी मजला तुझे गूण गाता ॥ २ ॥

रंगे तुझि वाणी कृष्ण गूण गानी
तुझ्या रुपि आले दत्ता वेद-व्यास मूनि
तुझे प्रेम पाहुनी तृप्त झाले आता ॥ 3 ॥

दर्शनांसी आले तुझिया धरुनि भाव-भोळा
नयनात जमल्या देवा आसवांच्या माळा
मिरा ठेवि चरणिं तुझिया जीवनाचा गाथा ॥ ४ ॥

# सावळे विठाई

सावळे विठाई माझे आई
घेऊनी कुशीत प्रेम पान्हा देई - सावळे विठाई ॥ धृ ॥

हांक गजेंद्राची एकुनी धाऊनी गेलासी
स्तंभी प्रकटोनी दर्शन दिले प्रल्हादासी
उष्टी बोरे खाऊनीया तू दिली मुक्ती शबरीसी
पुंडलिका साठी उभा तू विटेवरि राहसी ॥ १ ॥

संकटातुनि सोडविले तूच द्रौपदीसी
पद स्पर्शाने उध्दरिले तूंच अहिल्येसीं
विठू महारासाठी तू महारही झालासी
सख्या अर्जुना साठी तूं चक्र हाती धरिलेसी ॥ २ ॥

हांक एकदा तरी माझी का न तू ऐकसी
प्रश्ण हाचि दुःख देतो माझ्या मनासी
कोणत्या गुन्हयाची मजला शिक्षाहि देतोसी
धैर्याने समोर सांग मान्य करिन त्यासी ॥ 3 ॥

गुणगान करण्या तुझे भाव मनी देई
सप्तसूर बनूनी कंठी तूच ये कृष्णाई
प्रेम रंगमे तुम्हारे 'मीरा' राधा बन गई
बन्सुरी बजाके मेरी साथ दे कन्हाई ॥ ४ ॥

# राग - मारो बिहाग

नाम घेतो तुझे आम्ही जय जय राम कृष्ण हरी
ऐकू येते कारे साद आमुचि सांग आता तरी ॥ धृ ॥

नाही प्रेम नाही भक्ती देवा आमुच्या अंतरी
शब्द ओठी ना कंठी ना सूर ताल ना जरी
वेडे वाकुडे गुणगान तुझे करतो श्री हरी ॥ १ ॥

मोहमायेच्या रे पडलो आम्ही भवसागरी
ज्ञान नौके मधुनी घेउनी जा रे आम्हा पैलतीरी
नुसता उभा राहुनी पाहूनको असा विटेवरी ॥ २ ॥

जन्मो जन्मी फिरुनि आली मीरा आज तुझ्या द्वारी
आहे एकच दौलत माझी, डोळ्या मधले अश्रू हरी
मानवतेचे मनोगत ज्यात आहे तो वाहते चरणावरी ॥ 3 ॥

# राग - कल्याण

कान्हारे वृंदावनी आज आले
भेटीलागी माझे मन आतुरले रे ॥ धृ ॥

गोकूळात ही जाऊनी आले
दह्या दुधांचे सडें पाहिले
मात यशोदा दर्शन घडले
पूण्यवान मी ठरले रे ॥ १ ॥

सावळ्या रुपाचे मज वेड लागले
वेणू नादे मुग्ध जाहले
सप्त सूरांमधे न्हाऊनी गेले
माझी न मी राहिले रे ॥ २ ॥

मधूर चांदणे शरदा मधले
रास क्रिडा तुज संगे खेळले
गोपी कृष्ण अव्द्वैत अनुभविले
प्रेम रंगी रंगले रे ॥ 3 ॥

राधा कृष्ण तन मन झाले
मोर पिसासम भाव ही फूलले
जीवन सत्य मिरेसी कळले
विश्वरुप मी होऊनी गेले ॥ ४ ॥

# राग - कल्याण

हे श्याम सुंदर गिरीधरा राधे प्रिया मन मोहना
तव नामी रंगूनी राहू दे आता हरी माझ्या मना ॥ धृ ॥

त्या गोपीकांच्या गोकुळी यावे यशोदा होऊनी
विसरुनी जावे मी मला त्या विश्वरुपा पाहुनी ॥ १ ॥

शरदाचे चांदणे होऊनी यमुना तिरी त्या येऊनी
ती रास लीला पाहुनी नाचावे मी आनंदुनि ॥ २ ॥

मीरेची भक्ती होऊनी मुक्तीची तार ति छेडुनि
व्दारी यावें सुदामा होऊनी भेटावे तुज आलिंगुनि ॥ 3 ॥

पार्थाचे घोडे होऊनी संग्रामी जीवनी जिंकुनि
मीरेचा अंतिम श्वास तो कृष्ण अधरी राहो वेणु होऊनी ॥ ४ ॥

प्रश्ण तुमचा कुठें कृष्ण आहे ?
अणुरेणु मधे भरुनी उरलाहे ॥ धृ ॥

प्रश्ण तुमचा कुठें कृष्ण आहे ?
गोप गोपीच्या संगे खेळताहे
यशोदेच्या तो अंकी झोपलाहे
विश्व रुपासी त्या दाविता हे ॥ १ ॥

प्रश्ण तुमचा कुठें कृष्ण आहे ?
द्रोपदिची तो लाज राखताहे
विदुराच्या कण्या खात आहे
सुदाम्याच्या तो सेवि रंगला हे ॥ २ ॥

प्रश्ण तुमचा कुठें कृष्ण आहे ?
अर्जूनाचे घोडे धूत उभा आहे
धर्म संग्रामी सारथी बनूनी
गीता ज्ञान अर्जुनासी देत आहे ॥ 3 ॥

प्रश्ण तुमचा कुठें कृष्ण आहे ?
सर्व जीवात्मा कृष्णची आहे
अहंकारासी त्यागुनि पाहारे,
श्रध्दा विश्वासाने अनुभवा हे ॥ ४ ॥

प्रश्ण तुमचा कुठें कृष्ण आहे ?
तुमच्या हांकेचि तो वाट पाहे
भक्तासाठी अखंड धावतो हे,
सूर 'मीरेचा' कृष्ण बनला हे ॥ ५ ॥

# राग - भूप

॥ पवित्र क्षेत्रांचे स्मरण आणि संत चरणी वंदन ॥

रुप एक असती नांवे अनंत तुम्हाला
गुरु चरणी करीतो आम्ही नित्य वंदनाला ॥ धृ ॥

कुणी जातो आळंदीला भेटण्या माऊलीला
कुणी जातो तुकयाची ती गाथा गाण्या देहूला
कुणी कावडी वाहाण्या जातो नाथांच्या पैठणल गुरुचरणी ... ॥ १ ॥

कुणी जातो पीठापूरला कुणी कुरुगड्डीला
कुणी जातो माणिकनगरी कुणी अक्कलकोटला
कुणी जातो दर्शनाला गाणगापूरला गुरुचरणी ... ॥ २ ॥

कुणी जातो औदुंबरला कुणी नरसोबा वाडीला
कुणी जातो कारंज्याला कुणी अबूच्या पाहाडाला
कुणी जातो गीरनारी हो दत्तजन्म स्थानाला गुरुचरणी ... ॥ 3 ॥

कुणी पूजितो त्या शेंगावच्या गजाननाला
कुणी गोंदवल्याच्या भजतो ब्रम्हचैतन्याला
कुणी घालतो सांकडे शिर्डी साईबाबाला गुरुचरणी ... ॥ ४ ॥

कुणी भेटतो पावसच्या स्वरुपानंदला
कुणी धुमवीतो ओंकार पंत बाळेकुंद्रीला
कुणी जातो कडगंचीला गुरुचरित्र स्थानाला गुरुचरणी ... ॥ ५ ॥

कुणी टेंबे स्वामी दर्शनं घेती माणगांवाला
कुणी कुडुत्री जाऊनी दिक्षा मागे वामनाला
कुणी मंत्र घेण्या जाती नानांच्या तराण्याला गुरुचरणी ... ॥ ६ ॥

कुणी नारायण काकांच्या दर्शना जाई नाशीकला
कुणी अरविंद काकांच्या जाई खामगांवला
कुणी भेटती नाणिजला नरेंद्रस्वामीला गुरुचरणी ... ॥ ७ ॥

कुणी नरसोबावाडीला भेटे कविश्वर दत्ताला
कुणी सुख दुःख सांगे जालन्याच्या ताईला
कुणी अरुण काकांच्या जातो क्षेत्र यावलीला गुरुचरणी ... ॥ ८ ॥

कुणी चालणारा देव राहतो कामकोटीला
कुणी शंकराचार्यांच्या जातो शृंगेरीला
कुणी गुलबर्ग्यासी येतो भेटण्या सदाशिवाला गुरुचरणी ... ॥ ९ ॥

कुणी जातो सज्जनगडला रामदास भेटीला
कुणी जाई श्रीधर स्वामिच्या जन्मस्थानी चिंचोळीला
गुरु उभा मागे पूढे येतो अनुभव 'मीरेला' गुरुचरणी ... ॥ १० ॥

कुणी सेवा करण्या जातो मंत्रालयाला
कुणी कान्हन्‌गडा जातो रामदास भेटीला
चराचरी सद्गुरु भरला मनी ठेवा या भावाला गुरुचरणी ... ॥ ११ ॥

# राग - भैरवी

दत्त धामी येवोनीया आम्ही धन्य झालो हो
गुणगान करुनि गुरुंच्या भक्ती मधे न्हालो हो ॥ धृ ॥

गुरुदेवा कविश्वरा हो माँ ताई भगवति हो
नित्य घडो चरणी सेवा अशी बुध्दि द्याना हो
सप्त सुरासंगे दत्त भजनी रंगलो हो
गुणगान करुनि गुरुंच्या भक्ती मधेन्हालो हो ॥ १ ॥

गुरु रुपे अनंत असति गुरु भाव एकच हो
दत्त जो माझ्या ह्रदयात तोच तुझ्या ह्रदयी हो
नकावाटू देऊ मनाला गुरु वेगळाले हो
गुणगान करुनि गुरुंच्या भक्ती मधेन्हालो हो ॥ २ ॥

मन माझे नित्य राहो गुरु स्मरणी देवा हो
भक्ती प्रेम भिक्षा ओटी आज हिच घाला हो
मिरेच्या जीवाचे हे पुरवा डोहाळे हो
गुणगान करुनि गुरुंच्या भक्ती मधेन्हालो हो ॥ 3 ॥

पंथ अनेक असती मार्ग वेगळाले हो
जायाचे सर्वांना जेथे ते मोक्षधाम एकच हो
मनातील गोंधळ सारा आज संपवुया हो
माणुसकी माणसांतील मनी जागवु या हो ॥ ४ ॥

# राग - भिंपलास

हे सूर चंद्रीका गोविंद प्रिया गोपाल प्रिया ॥ धृ ॥

सप्त सूरोंकी तू है जननी
शुभ मंगल ओंकार स्वरुपिनी
भाव भक्तींकी तूं है स्वामिनी
अधर धरे श्री गोविंद सखा हे सूर चंद्रिका ... ॥ १ ॥

जनम दिया तुझे बास वृक्षने
नाम रखा श्री हरीका तूने
नाद ब्रम्हसे गूंजे सब जग
नाम लेत श्री बन्सीधर का हे सूर चंद्रिका ... ॥ २ ॥

जमुना तट पर तूं बजती रही
शरद ऋतुमे रंग बरसत रही
गोपियन के संग रास रचत रही
दिवानी बनी राधा प्रेमीका हे सूर चंद्रिका ... ॥ 3 ॥

पवित्र जीवन देखके तेरा
श्री गिरीधरने तुझे अपनाया
समझ ना आवे ये सूर माया
बनजा सूर अब मीरा कंठका हे सूर चंद्रिका ... ॥ ४ ॥

# राग - वीभास

दत्त नाम जेव्हा ओठी येते रे
मन माझे आनंदाने फुलते रे ॥ धृ ॥

नाम घेता घेता तुझे रे नृसिंहा
मी कोण आहे विसरुनी जाते रे ॥ १ ॥

कर्म भक्तीचि तुझि ही मूर्ती रे वासुदेवा
नयनात साठविते मी माझ्यारे ॥ २ ॥

स्वरांमृतांनी तुझी पूजा मी बांधते रे नाना
ओवाळीते भाव भक्ती ज्योतीने ॥ 3 ॥

कणा कणामधें तू नटलासी रे अरविंदा
तुझ्यात मीरा कृष्ण पाहते रे ॥ ४ ॥

# राग - पटदीप

आलो आम्ही, आलो आम्ही, आलो आम्ही दत्त दर्शनाला
टाळ, विणा, मृदुंग घेऊनी आलो भजनाला ॥ धृ ॥

गुरु उद्धार माउली, गुरुचि सौख्य सावुली
जरा नरा फावली, तया सिध्दि गावली
गुरु गुरु गुरु गुरु म्हणोनि जो स्मरे नरु
तरुनि मोह सागरु सुखी घडे निरंतरु ॥ १ ॥

गुरु बाप माऊली गुरुदीन साऊली
गुरु शिष्य वासुरांसी कामधेनु गावली
गुरु चिंतितार्थ दे गुरुचि तत्व तो वदे
अलभ्य मोक्षलाभ आपुल्या कृपे गुरुचि दे ॥ २ ॥

गुरुचि मूळ दीप रे जगद्‌गुरु स्वरुप रे
गुरुचि ज्ञान बोध रे गुरुचि सर्व शोध रे
गुरु थोर सान रे महासुख निधान रे
गुरु गुरु गुरु गुरु करि म्हणोनि गान रे ॥ 3 ॥

नमो गुरु कृपा करा, नमो नमो गुणाकरा
नमो गुरु परात्परा, नमो गुरु महत्तरा
नमो गुरु सनातना, नमो गुरु मनोन्मना
नमो गुरु घना घना नमो गुरु निरंजना ॥ ४ ॥

जयनाना

**प. पूज्य दत्तमहाराज आणि प. पू. सौ. आई सांहेब गेल्यावर**

रचलेली ही श्रद्धांजली

जीवशिवानी मांडीलेला खेळ आजि संपला
स्वेळ असा बिनतोड झाला दो जीवानीही जींकीला ॥ धृ ॥

भाग्यलक्ष्मी भाग्य घेउनी माहेरी आधी गेली निघुनी
स्वागता साठी पतीच्या दारी थांबली येऊनी
दत्त गेले भटेण्या तिज विरह नाही सहन झाला ॥ १ ॥

आई बाबा कुणी न उरले आज मन् बेचैन झाले
भान कसले नाही राहिले दुःख कसे ते आज कळले से
दुःख सुख हे सर्व खोटे येउ द्या हे अनुभवाला ॥ २ ॥

पाठी होते चार हात भक्त होते अती सुखांत
का असे दाघेही गेले पोरके करुनी आम्हाला
रात अगणिंत आज झाले का. न. समजे हे मनाला ॥ 3 ॥

पंचतत्वी मिळूनी गेला दूर होता जवळी आला
'मीरे' कंठी सूर होऊनी 'भैरवी' मधे रंगला
वाजणाऱ्या कृष्ण पैंजणी जीव तुम्ही हा वाहिला ॥ ४ ॥

जयनाना

# आरती

सोनियाचा दिवस आजि अमृते पाहिला
ओवाळीतो पंचारती दत्त कवीश्वर तुजला ॥ धृ ॥

हृदयात उजळो आमुच्या भक्ती प्रेम ज्योती
नको आता आंस कसली देई देई मुक्ती
आनंदात ठेवी आमुच्या नित्य तूं मनाला ॥ १ ॥

सुख दुःख पचविण्याची देई आम्हा शक्ती
कर्मयोगी बनवा दत्ता नकों फलासक्ती
सेवा भाव कसा धरावा शिकवीं आम्हाला ॥ २ ॥

अगणिंत नक्षत्रें ही नीलनभी असती
आयुलाभो तुजला तितुके करीतो विनंती
पैलपार नेई आता भक्तासह 'मीरेला' ॥ ३ ॥

जयनाना

# दृष्ट

कविश्वरा दत्ता बाळा का असा उदास
दृष्ट कुणाची झाली ग आज या जीवास ॥ धृ ॥

पौर्णिमेच्या चंद्रावरी कां आज अशी छाया
चिंता जगताची करुनी थकली ही काया
किती कष्ट करीशी दत्ता शांत जरा बैस ॥ १ ॥

अलौकीक रुप तुझे पाहुनिया दत्ता
आनंद किती हो झाला कशी सांगू आता
परी क्षणभरी कां झाले मन हे उदास ॥ २ ॥

कुणी तरी दृष्ट काढा सुगंधी फूलानी
कुणी दृष्ट काढा आता भक्ती पदरानी
गुरुभक्ती प्रेमरंगी ब्रम्ह आले रंगण्यास ॥ 3 ॥

मीरा एकतारी हाती घेऊनिया आली
सप्तसूरानी रे दत्ता दृष्ट तुझी काढली
उतरली दृष्ट करा दत्त दत्त नाम घोष ॥ ४ ॥

जयनाना

# पाळणा

जोजोरे जोजो कवीश्वर दत्ता
अंगाई मी गाते तूजला भगवंता ॥ धृ ॥

त्रैलोक्याचा राणा धरणीवर आला
विश्वाच्या पाळणी शांतपणे झोपला
भक्तासंगे खेळुनी दमलसी अनंता ॥ १ ॥

रक्षण धर्माचे हे करण्या अवतरला
श्री कृष्ण गूणगानी रंगुनीया गेला
आलासी परतुनी का सांगण्यासी गीता ॥ २ ॥

अगणित भक्तांसाठी झिजविशी काया
नकळे फोणालाही दीव्य तुझी माया
दर्शन घेता लाभे चांदण्याची ममता ॥ 3 ॥

ज्ञानसुर्य पुत्रअसा देऊनीया जगता
धन्य पिता झाला तो धन्य झाली माता
टेकूदे तव चरणी 'मीरेचा' माथा ॥ ४ ॥

जयनाना

## प. पू. सौ. आई सादेब यांच्यावर रचले गेलेले गीत

माँ सावित्री श्री लक्ष्मी तूं जय पार्वती माते
भक्तीगीत हे तुझ्याच साठी आई मी गाते
ब्रम्हा, विष्णू, महेशमूर्ती अवतरले तव पती स्वरुपी
तिन्ही शक्ती त्या जाया होऊनी आल्या तव रूपी
ॐकाराची प्रणव शक्ती तूं दीव्य अशी शोभते ॥ १ ॥

कमलदलासम संसारी तूं शांतपणे नांदशी
पती परमेश्वर हाचि भाव तूं मनामथे ठेविशी
अखंड कर्मी राहुनी तव मन दत्तनाम जपते ॥ २ ॥

माँ भगवती ताईजी तुम्ही मज स्फूर्ती ही दिधली
गुंफुनी गीता सेवा माझी अल्पशी घडली
अशीच सेवा सदैव घ्यावी विनती मी करीते ॥ 3 ॥

फिती जन्माचे पूण्य हो माझे आज फळा आले
तूं माताश्री अन् दत्तपिताश्री 'मीरेसी' लाभले
चार हात मम पाठी अस् द्या हेची मी मागते ॥ ४ ॥

# राग - तोडी

## भूपाळी

उठा कवीश्वर दत्ता आता वाढ वेळ झाला
पूर्व दिशेला उभी उषा रे तुझ्या दर्शनाला ॥ धृ ॥

सर्व चराचर जागे झाले घरटया मधूनी पक्षी उडाले
दत्त दत्त नामाचा तुझिया चौघडा वाजला दत्ता ॥ १ ॥

जात्या वरती ओवी गाऊनी कुणी उठवी तुजला
वेद घोष घुमवीत पहा हो दशदीशा आल्या ... दत्ता
दशदिशा आल्या ... ॥ २ ॥

सूरनर मुनी गंधर्व येऊनी करिती गायनाला
राग रागिण्या जागें करण्या गाती भूपाळया
तुजल गाती भूपाळया ... ॥ 3 ॥

भक्ती भाव होऊनी हृदयीं बसा सूर साधनेला
'मीरेची' भूपाळी रंगवा प्रातः समयाला
रंगवा प्रातः समयाला ... ॥ ४ ॥

उठाकवीश्वर दत्ता आता वाढवेळ झाल

# राग - भूप

रंगात असा हा सप्तरंग चढतो सद्गुरुच्या भजनी
त्या टाळ मृदुंगावरची गोड ही थाप हो पडता कानी
त्या स्वर्गीय सूर सत्संगी रंगुनी दंग होऊनी गाते
मीरा ही बावरी सूरमयी मीरा बावरी ॥ धृ ॥

किती जन्मी हो पूण्य मी केले
गुरुमंत्रानी पावन झाते
मोर पिसासम भाव ही फूलले
या भक्तीच्या गंधाने भरले विश्व पाहुनी नाचे
मीरा ही बावरी गुरुंची मीरा ही बावरी ॥ १ ॥

शक्तीच्या दरबारी मी गेले मा ताईचे दर्शन घडले
भगवतीच्या चरणी मी झुकले
जगदंबे मंदीरी घालूनी गोंधळ भक्ती जोगवा मागे
मीरा ही बावरी ताईची मीरा ही बावरी ॥ २ ॥

तन वृंदावन मन कृष्ण झालें गोप गोपीच्या प्रेमी रमले
प्रेम तत्वाने सर्व ब्रम्हाड व्यापिले
या अद्वैताच्या रासलीले माजी ओठी राहिली मीरा
होऊनिया बासुरी हरीची होऊनिया बासुरी ॥ 3 ॥

सद्बुध्दी दे सत् संगती दे
गुरु सेवा अशी नित्य घडू दे
सर्वा ठाई तुज पाहूदे ऽ
मनः शुध्दि ऐसी होऊ देरे होचि दान देवा दे
मीरा ही बावरी मागते दान मीरा ही बावरी ॥ ४ ॥

# राग - भैरवी

कैसे रहू (जीयूँ) तोरे दरस बिना नाना
हे गुरुदेवा हे गुरुनाना ॥ धृ ॥

आवन कहे गये आजहून आए
देके बचन कैसे नाना भूल गए
बाट तकत मोरे थक गए नैना ॥ १ ॥

तुमने सिखाया कैसे काँटो से भि प्यार करना
जगण्याचा अर्थ खरा नाना तुम्ही दावीलाना
एकबार आके अबतो गले लगा लेना ॥ २ ॥

तेरी कृपा से ही ए जनम् मिला है ना
'मीराकी' जीवन् नैया अब तेरे हाथ है ना
भव सागरसे अब पार कर दो नाना ॥ 3 ॥

## **स्मरण सेवा** राग - भैरवी

जय माताश्री, जय पिताश्री, चरणी असे वंदना
जय गुरु नाना, दत्त कविश्वर, योगीराज वामना
जय नारायण काका, जय जय अरविंदा कृष्णा
जय स्वामी रामदासा, अरुणकाका, जय श्री स्वामी नरेंद्रा
प. पूज्य श्री ताई भगवती जय जय श्री सदाशिवा
जय पंतराजा, जय माणिकप्रभू जय गजानना देवा
नित्य राहा तुम्ही आमुच्या पाठी सद्गुरुनो देवा
आमच्या कडुनि नित्य घडावी तुमचि चरण सेवा

# राग - मीश्र पिलू

नाना करते हैं जो, ठीक करते हैं
इससे सबका भला हो जाता है ॥ धृ ॥

जीवन मे ये दुःख क्यूँ आते हैं
कर्म भोग हमारे है ये हम जानते हैं
नाना आपके चरन अब तो हमने छुवे हैं
कर्म भोग सहनेकी भिक्षा माँगते हैं ॥ १ ॥

दर्दभरी जिंदगी ही जीना हम चाहते हैं
जींदगी मे दर्द ना हो तो मजा हि क्या है क्युँ के
दर्द भरि जिंदगी मे नाना याद आते है
याद तुम्हारी नाना जिंदगी हमारी है ॥ २ ॥

नाना सबके हृदय मे हि बैठे हुवे हैं
पर कभी कभी हम ए भूल जाते हैं
माया मोहके जादू नगरमें हम बसें हैं
जाने अंजाने मे हम फ़स जाते हैं ॥ 3 ॥

मन लगे ना लगे तेरा नाम लेंगे हम
तू सने या सुने ना पुकारेंगे हम
नाना तेरे नाम का डंका हम बजाते हैं
तुझे सुनना पडेगा ये गुरु धर्म है ॥ ४ ॥

जीवनकी हमरी नैया तेरे हाथ है
तू चाहे जहाँ लेजा तूही पतवार है
भवसागर से अब कोई हमे डर नहि है
मीलजाएगा किनारा ऐसा विश्वास है ॥ ५ ॥

नाना तेरे नाम मे हि भक्ती, शक्ती, मुक्ती है
नाम सागर में मीरा डूब जाती है
उसने अपना जीवन तेरे चरनोमें रखा है
अुसके दिलकी धडकन नाना नाना कहेति है ॥ ६ ॥

# राग - भीमपलास

ब्रह्मश्री कविश्वर गुरुदेव दत्ता
वाटे पुन्हा तुजसाठी रे अभंग एक गावा ॥ धृ ॥

वेडे वाकुडे हे शब्द भावावीण येती ओठी
तरीही प्रेमे ऐकुति घेशी माय जगजेठी
भोळी माझी सेवा कशी गोड वाटे तुझ्या जीवा ॥ १ ॥

चांदण्यापरि हे दत्ता तुझे शांतरुप
दर्शन घडता सरतिं मनीचे विकल्प
चिंतनात काळ जावो आशीर्वाद द्यावा ॥ २ ॥

जन्मोजन्मी तुझाचि दत्ता घडो सहवास
माया मोह संसारी या नको गुंतवूस
जागृती सुषुप्ती मजला दत्तची दिसावा ॥ 3 ॥

कोरडया विचारे सारे आयुष्य हे सरले
मीच आणी माझे सर्व मन यांत गुंतले
अहंकार 'मीरेचा' हा तूंची घालवावा ॥ ४ ॥

# राग-शिवरंजनी

दया मागते मी कविश्वर दत्ता
ये धावुनि रे मज साठी आता ॥ धृ ॥

माझ्या अंगीचे दोष किती सांगू देवा
दोष हेचि गूण वाटे माझ्या जीवा
न्यावे तूचं आता सत्याचिया पंथा ॥ 1 ॥

संसार असार उपदेश ठावा
प्रत्यक्षात ऐसा अनुभव द्यावा
समाधान शांती लाभो माझ्या चित्ता ॥ 2 ॥

भक्ती भाव हृदयी कसा जागवावा
हेचि ज्ञान द्यावे मज ज्ञानदेवा
मिरे संग राही नित्य भगवंता ॥ 3 ॥

# राग - बिलासखानी तोडी

तुझे स्मरण होऊदे मजला प्राण जातांना
कविश्वर दत्ता गुरुदेव नाना ॥ धृ ॥

तुला जाणण्या साठी रे जन्म तू दिला मजला
कधी नाही आठविले तुजसी दयाळा
अपराध घडला देवा क्षमाआता कराना ॥ १ ॥

ऐहिक सुखाचि तुजला मागणी मी केली
दिले सर्व तूं ही अजुनी पृप्ती नाही झाली
नको आंस कसली नको वासना ॥ २ ॥

आता तरी हरी रे मजसी, गोकुळांतन्यावे
राधे संगे राऊळांत दर्शन घावे
बासुरीचा सूर अंति, कानी पडू दे नां ॥ 3 ॥

लेक लाडकी ही 'मीरा' दारी आली देवा
उशीर नको घाला ओटी आनंदाचा ठेवा
शेवटीच्या दिवशी यावे करण्या कन्यादाना ॥ ४ ॥

चरणी तुझ्या मी ठेवियला हा माथा
या जीवनाचा भार घ्या हो नाना आता ॥ धृ ॥

मी कोण आहे, कोठुनि आले
जाणार कोठे, कांही कळेना
धरुनीया हाता वाट दावी नाथा ॥ १ ॥

नाही मनी भक्ति, ना प्रेम भाव
नाना विकल्पांनी भरला स्वभाव
का जन्म ऐसा, दिला भगवंता ॥ २ ॥

पर दुःखाची ना, मनासी जाणीव
आपुल्याच स्वार्थी, रमतो हा जीव
निस्वार्थी जीवन जगवा हो दाता ॥ 3 ॥

हे आत्म ज्ञान जर तू नाही दिले रे
अज्ञानी राहील मीरा तुझी रे
शोभेल का तुज हे सांग जगन्नाथा ॥ ४ ॥

देहाचे हे भोग, कधि संपतील
तुझे आणी माझे सूर, कधि जुळतील
सूर मुक्तीचा कंठी यावा स्वामी आता ॥ ५ ॥

# राग-शिवरंजनी

गुरु नानाजी कृपा करो
हम दीन जन पे दया करो ॥ धृ ॥

संसार सागर अति अपार
तुम तो हो एक तारन हार
ताप तृय को तुम हरो ॥ 1 ॥

काम क्रोध हे अति भयानक
ज्ञान दाता तुम्ही हो तारक
ज्ञान ज्योती मन मे भरो ॥ 2 ॥

तुम तो हो करुणा के सागर
हे ब्रम्हा विष्णू महेश्वर
आशिस से झोली सदा भरो ॥ 3 ॥

# राग - मालकंस

श्री गुरु चरित्रातील अध्याय ४१ मधील गीत ४३४

दत्तात्रेया तव शरणम, दत्तनाथा तव शरणम् ।
त्रिगुणात्मका त्रिगुणातीता त्रिभुवनपालक तव शरणम् ॥
करुणानीधे तव शरणम् करुणासागर तव शरणम् ।
'श्रीपाद श्री वल्लभ' गुरुवर "नृसिंव्ह सरस्वति" तव शलणम् ॥

कंडे नम्मा इंदू कंडे नम्मा
मंडलदोळगे यतिवर राय चंद्रमन्ना ॥ धृ ॥

तत्व बोधेय उपनिषत् तत्व चरितना
व्यक्तवाद परब्रम्हमूर्ति यनिसुवना ॥ १ ॥

शेष शयन परवेश कायकना
लेसु कृपेय निमिषनंव भाषा परि पालकना ॥ २ ॥

गंध परिमळ दिंद शोभितानंद सागरना
छंदवुळळ योगींद्र गोपि वृंद वल्लभना ॥ 3 ॥

मंत्र कूटदि मेरेदु स्वातंत्र्य नादवना
इंतू निगमागमद सकलकांति युळ्ळवना ॥ ४ ॥

करियराय नोनिपंगे वरद गुरुरायना
नृसिंव्ह सरस्वत्यंब नारी पुरुष नामकना ॥ ५ ॥

# राग - भूपाली

श्री गुरु चरित्रामधील अध्याय ४१ पद ४33 वे

काषाय वस्त्रम् कर दंड धारिणम्।
कमंडलू पद्म करे न शंखम्॥
चक्रम गदा भूषीत भूषनाढयम्।
श्रीपाद राजम् शरणम् प्रपद्ये॥

कंडे निंदू भक्त जनर भाग्य निधिय
भूमंडदोळगे नृसिंव्ह सरस्वतीया ॥ धृ ॥

कंडे निंदू दृष्टीइंदा वारीजदळ पादवन्नू
हृदय कमलदल्ली भजिसे सुखव नीव जगत्पतिया ॥ १ ॥

भोगी जनरी गेल्ला काम्य फलगळीत्तु सलहुत्तिरुव
योगीनीय रोडेय नृसिंव्ह सरस्वतिय पाद ॥ २ ॥

वाक्य कारणागी जगदि-हिडिदु दंडकमंडलू वनू
सगुण नेनेसी सूजनरीगे वलिद श्री गुरु यतिवरन्न ॥ 3 ॥

धरेगे गाणगापूर कैलास हरिदास रोडेय नेनेसी
करुणदिवर वित्तु पोरेव अनुदिन गुरुचरण वन्नु ॥ ४ ॥

# भैरवी

बाजे किसनकी पैंजनीया या भैरवीला एक आगळी-वेगळी अशी पार्श्वभूमी लाभली आहे. माझे शक्तीपात दिक्षा गुरु प. पू. दत्त महाराज कविश्वर यांचे निवासस्थानी आमची नेहमीच भजन सेवा घडत असे. एकदा असेच शेवटी भैरवी "बाजे किसनकी पैजंनीया" सादर केली. ती भैरवी ऐकून प. पू. दत्त महाराज म्हणाले की "आज आम्हाला असे वाटते आहे की भक्तमीराबाईचे भजन ऐकून श्रीकृष्णाला त्या वेळी काय वाटले असावे याची अनुभूती आम्हाला झाली"महाराजांचे हे शब्द म्हणजे मला मीळालेला गुरु प्रसादच होय. या भैरवी वर महाराजांचे अतिशय प्रेम. प्रत्येक कार्यक्रमाच्या आधी ते वीचरायचे आज बाजे किसनकी घेणार ना ?

ते शब्द संत मीराबाईचे त्या शब्दाना मी माझ्या परीने सूरानी सजवीले आणी श्री गुरुनी त्या सुराना आपल्या सूरांत मिळवून घेतले या हून दुसरे भाग्य ते काय असणार

**"मीरा"**

# राग-भैरवी


बाजे किसनकी पैंजनीया
माता यशोदा चलना सिखावे
हाथ में लेकर उँगलीया ॥ धृ ॥

ब्रम्हा जा को ध्यान धरत हैं
वो शाम खेलत गौलनीया ॥ 1 ॥

मिरा के प्रभू गीरीधर नागर
वे तीन लोक के रे धनिया ॥ 2 ॥







प. पू. दत्त महाराज कविश्वर